अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७५/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/५८३२ दि. २६/८/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७५/२०२४

Sadhana Mahamuni
403 Courtyard, Pashan
Near Water Purification center
Pune-411021

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

Sadhana Mahamuni, 403 Courtyard, Pashan, Near Water Purification center, Pune-411021 (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२७/६/२०२४ (PUMCO/R/2024/60899) (आ.क्र.५०६७, दि.०१/०७/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४२९३, दि.२६/७/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २७/६/२०२४ | १/७/२०२४ | ३१/७/२०२४ | २६/७/२०२४ | ० |

Provided Incomplete, Misleading or False Information PUMCO/R/2024/60899 मी माहिती अर्जात मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. जाणूनबुजून ३० व्या दिवशी मोघम स्वरुपाचे उत्तर देऊन माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणेची कार्यवाही चालू आहे असे मोघम स्वरुपाचे उत्तर देऊन माहिती दिली नाही. कृपया माहिती अर्जात मागणी केलेली माहिती मला विनामूल्य साक्षांकित करुन मिळावी तसेच जी माहिती देणे शक्य नाही त्याबाबत स्पष्ट कारण नमूद करावे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कोणत्या कलमान्वये माहिती देणे शक्य नाही ते नमूद करावे,ही नम्र विनंती, असे नमूद करुन दि.२७/७/२०२४ रोजी (PUMCO/A/2024/60208) (आ.क्र.७१७३ दि.२९/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २७/७/२०२४ | २९/७/२०२४ | २५/८/२०२४ | होय | --- |

सदर अपिलाची सुनावणी दि.२१/८/२०२४ रोजी स.११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/५१९८, दि.१३/८/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होत्या. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते .

## विवेचन

Provided Incomplete, Misleading or False Information PUMCO/R/2024/60899 मी माहिती अर्जात मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. जाणूनबुजून ३० व्या दिवशी मोघम स्वरुपाचे उत्तर देऊन माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणेची कार्यवाही चालू आहे असे मोघम स्वरुपाचे उत्तर देऊन माहिती दिली नाही. कृपया माहिती अर्जात मागणी केलेली माहिती मला विनामूल्य साक्षांकित करुन मिळावी तसेच जी माहिती देणे शक्य नाही त्याबाबत स्पष्ट कारण नमूद करावे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कोणत्या कलमान्वये माहिती देणे शक्य नाही ते नमूद करावे,ही नम्र विनंती, असे नमूद करुन दि.२७/७/२०२४ रोजी (PUMCO/A/2024/60208) (आ.क्र.७१७३ दि.२९/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२७/६/२०२४ (PUMCO/R/2024/60899) (आ.क्र.५०६७, दि.०१/०७/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. मूळ माहिती अधिकार अर्जामध्ये नगर विकास विभागाचे जा.क्र.मअअ/२०२४/सं.५३४/प्र.क्र.१५०/नवि-२२ दि.३०/४/२०२४ यापत्राचे अनुषंगाने सादर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवालाची माहिती मिळणेबाबत कळविले होते. मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४२९३, दि.२६/७/२०२४ अन्वये प्रकरणावर कार्यवाही चालू आहे, अशी माहिती दिलेली आहे.

अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होत्या. अपिलार्थी यांनी दि.१३/८/२०२४ रोजी सुनावणीचे अनुषंगाने ईमेलद्वारे लेखी म्हणणे सादर केले आहे. त्यातील महत्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे-

1) माहिती अधिकार कायद्यांतर्गत मी मागितलेल्या माहिती अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर ३० व्या दिवशी माहिती अर्जातील मुद्दा क्र १ ला “ सदर पत्राच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणेची कार्यवाही चालू आहे ” असे उत्तर दिले व मुद्दा क्र २ ते ६ ला वरील प्रमाणे असे मोघम व दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे.
2) मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो कि, माहिती अर्जातील मुद्दा क्र १ मध्ये नमूद केलेले पत्र दि.३०/०४/२०२४ रोजीचे आहे. तीन महिने ( १२ आठवडे ) पेक्षा जास्त कालावधी होऊनही संबंधित टेबल क्लार्क यांनी शासनाच्या आदेशानुसार अहवाल तयार केलेला नाही. मी माहिती अधिकार कायद्यांतर्गत अहवालाची मागणी केल्यानंतर अहवाल तयार करण्याचे काम सुरु झाल्याचे समजून येत आहे. त्यामुळे संबंधित

टेबल क्लार्क यांनी विलंब का केला ? याची चौकशी होऊन संबंधित टेबल क्लार्क यांचेवर विलंबास प्रतिबंध कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी.

3) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मला मुद्दा क्र २ ते ६ ची माहिती नाकारलेली आहे. " वरील प्रमाणे " असे मोघम व दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे.

4) मी दाखल केलेल्या माहिती अर्जावर मला जाणूनबुजून मोगम स्वरूपाचे व दिशाभूल करणारे ३० व्या दिवशी उत्तर देऊन अपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे विरुद्ध माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी नुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

5) अपील सुनावणीच्या वेळी या पत्राद्वारे/ ई मेल द्वारे मी दाखल केलेले लेखी म्हणणे विचारात घेऊन **नैसर्गिक न्याय तत्वानुसार** उचित कार्यवाही करण्यात यावी व मी मागितलेली माहिती मला निशुल्क, साक्षांकित करून ७ दिवसात ई मेल द्वारे पाठविण्यात / उपलब्ध करून देण्यात यावी.

मूळ माहिती अधिकार अर्जातील नमूद पत्रावर कार्यवाही सुरु असल्याने तसे कळविण्यात आले आहे असे सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

मूळ माहिती अधिकार अर्जामध्ये नमूद पत्रावर कार्यवाही सुरु असली तरीही, ज्यामुद्दांबाबत माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना अवलोकनार्थ देण्यात यावी. माहितीचे अवलोकनाअंती आवश्यक माहितीचे उत्तर पुन्हा तयार करुन माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी मूळ माहिती अर्जाचे अनुषंगाने माहिती अपिलार्थी यांना अवलोकनार्थ द्यावी. मूळ अर्जातील मुद्देनिहाय पुन्हा उत्तर तयार करुन ज्या मुद्दयांची माहिती सार्वजनिक स्वरुपातील आहे अशी माहिती अपिलार्थी यांना विनामूल्य आदेश प्राप्तीपासून ३० दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.७५/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
26-8-24

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**

जन माहिती अधिकारी,

आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.